# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 10 February 2025

Time 01.00 to 01.05 PM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक १० फेब्रुवारी २०२५ दुपारी १.०० वा.**

****

परिक्षेआधी तणाव येऊ न देता लक्ष्य समोर ठेऊन अभ्यास करण्याचा सल्ला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांना दिला आहे. नवी दिल्लीत परिक्षा पे चर्चा या कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. परीक्षेदरम्यान येणाऱ्या ताणतणाव आणि चिंतांवर मात कशी करावी याबद्दल बोलताना ते म्हणाले,

***बॅटसमन उस प्रेशर की परवाह नही करता, उसका पुरा ध्यान उस बॉल की ओर होता है। अगर आप भी इस प्रेशर को मन मे न लेते हुये अपना ध्यान आज मैने इतना पढना तय किया था, ये अगर कर लेते है। आप आराम से उस प्रेशर मे से भी अपने आप को निकाल सकते है।***

इतरांशी स्पर्धा करण्यापेक्षा स्वत:शीच स्पर्धा करण्याचा सल्लाही पंतप्रधानांनी यावेळी दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत शालेय विद्यार्थ्यांसोबत `परीक्षा पे चर्चा' हा कार्यक्रम पाहिला. राज्याचे माहिती आणि तंत्रज्ञान तसंच मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री आशिष शेलार यावेळी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एकप्रकारे जीवनाचा मंत्र मिळत असल्याचं मुख्यमंत्री म्हणाले,

***परीक्षा पे चर्चा याच्या माध्यमातनं विद्यार्थ्यांशी संवाद साधत, त्यांच्या मनातली भीती, त्यांच्या मनातले प्रेशर, त्याच्यावरचे उपाय हे या चर्चेतनं ते त्यांना सांगतात. आणि एक प्रकारे जीवनाचा मंत्र हा विद्यार्थ्यांना या माध्यमातून मिळत असतो.***

****

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज मुंबईत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. ही कोणतीही राजकीय भेट नव्हती, केवळ मैत्रीमुळे ही भेट घेतल्याचं, मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

****

कांग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी आज राज्यसभेत, देशात अन्न सुरक्षा अधिनियमाच्या अधिक प्रभावी अंमलबजावणीची गरज व्यक्त केली. शून्यकाळात या मुद्द्यावर बोलताना त्यांनी, राष्ट्रव्यापी जनगणनेला उशीर होत असल्यामुळे जवळपास १४ कोटी लोक अन्न सुरक्षा योजनेच्या लाभापासून वंचित रहात असल्याचा आरोप केला. त्यामुळे जनगणना लवकरात लवकर पूर्ण करण्याची मागणी त्यांनी केली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज फ्रान्स आणि अमेरिकेच्या दौऱ्यावर रवाना झाले. फ्रान्सच्या दौऱ्यात ते उद्या होणाऱ्या कृत्रिम प्रज्ञा कृती परिषदेत सहअध्यक्ष म्हणून सहभागी होतील. कृत्रिम प्रज्ञेच्या वापरासाठी नैतिक आणि जबाबदार मार्गदर्शक सूचना तयार करणं यावर परिषदेत भर दिला जाणार आहे. मार्सेली इथल्या नवीन भारतीय वकीलातीचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होणार आहे. पंतप्रधान फ्रान्सच्या दौऱ्यात अनेक द्विपक्षीय बैठका, व्यावयासिकांसोबतच्या चर्चांमध्ये सहभागी होणार असून आंतरराष्ट्रीय थर्मोन्यूक्लीअर एक्सपरिमेन्टल रिऍक्टर या संस्थेला भेट देणार आहेत.

****

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज प्रयागराज इथं महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमात पवित्र स्नान केलं. त्यांनी अक्षयावत आणि बडे हनुमान मंदीरालाही भेट देऊन, डिजिटल महाकुंभ केंद्रातून कुंभमेळ्याची पाहणी केली.

दरम्यान, आतापर्यंत ४३ कोटींपेक्षा जास्त भाविकांनी महाकुंभमेळ्यात त्रिवेणी संगमावर स्नान केल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

नांदेड जिल्ह्यात आजपासून हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम राबवण्यात येत आहे. नायगाव तालुक्यातल्या घुंगराळा जिल्हा परिषद शाळेत या मोहीमचं जिल्हास्तरीय उद्घाटन खासदार रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या मोहिमेअंतर्गत आरोग्य कर्मचारी बूथवर आणि घरोघरी भेट देऊन वयोगटानुसार डीईसी आणि अल्बेंडाझॉल ही औषधं देणार आहेत.

****

सुट्टे पैसे नसल्यामुळे अडचण होउ नये यासाठी राज्य परिवहन महामंडळाने एस टी बसमध्ये आता यूपीआय पेमेंटची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. या निर्णयामुळे गेल्या काही दिवसांपासून अकोला क्रमांक दोन आगाराचं यूपीआय पेमेंटद्वारे मिळणारं उत्पन्न २२५ टक्क्यांनी वाढलं असल्याची माहिती महामंडळाने दिली आहे.

****

सोलापूर जिल्ह्यात मोहोळ तालुक्यात तीन वाहनांची धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला, तर १५ जण गंभीर जखमी झाले. कोळेगाव पाटीजवळ एका दुचाकीस्वाराने कंटेनरला धडकून, पंढरपूरकडे जाणाऱ्या भाविकांच्या मिनिबसला धडक दिली. सर्व जखमींवर सोलापूर मधल्या एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

****